# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक- २०८** **दि.१२/०७/२०२२**

## ११७ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या दोन ईसमांवर कारवाई अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कामगिरी

दि.०९/०७/२०२२ रोजी रात्रौ २२.१५ वा. चे सुमारास मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्षातील अधिकारी व अंमलदार हे शांती नगर, सेक्टर ११, मिरारोड (पुर्व) परिसरात गस्त करीत असताना सेक्टर ११, भारत गॅस गोडाउनचे समोरील फुटपाथ येथे एक संशयित ईसम मिळुन आला. सदर ईसम नामे आफाक आसिफ सैय्यद, वय ३३ वर्षे याच्या कब्ज्यात ०८ ग्रॅम वजनाचा व ५६,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ मिळुन आला. त्यास नमुद अंमली पदार्थ विक्रीकरीता पुरविणाऱ्या ईसमाबाबत विचारणा केली असता माहिती मिळाली कि, ईसम नामे जफर आसिफ सैय्यद वय ३७ वर्षे, याचे मार्फतीने मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ त्यास विक्रीकरीता पुरविला होता. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने जफर असिफ सैय्यद याच्या राहते घरातुन १०९ ग्रॅम वजनाचा व ७,६३,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. संपुर्ण कारवाई दरम्यान एकुण ९,०१,८२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरुध्द नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. II ४९७/२०२२ अंमली पदार्थ कायदा कलम ८ (क), २१ (क), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दोन्ही आरोपींतास अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त मुख्यालय, अति. कार्यभार गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. देवीदास हंडोरे, सपोनि विलास कुटे, पो.हवा.धनाजी इंगळे, पवन पाटील, प्रदिप टक्के, अजय सपकाळ, सुभाष आव्हाड, विष्णुदेव घरबुडे, पो.शि. अजय यादव सर्व नेमणुक अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांनी केली आहे.

--------ooo--------